**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १३८/२०११ मधील नि. ६० वरील आदेश</u>**

प्रस्तुत दाव्याकामी वादीने नि. ४४ येथे अर्ज देवून न्यायालयाच्या आदेशाने दावा मिळकत अ.क्र. ३ च्या सर्व्हे वर्णनामध्ये दुरुस्ती करुन घेतलेली आहे. पूर्वी वादीने दावा मिळकतीचे सर्व्हे वर्णन दिले होते. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी कैफियत दिली होती. मात्र वादीने आता दावा मिळकतीच्या सर्व्हे वर्णनामध्ये बदल करुन घेतल्यामुळे त्या अनुषंगाने प्रतिवादीला कैफियत देण्यास परवानगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज आहे.

०२. सदरच्या अर्जास वादीने जोरदार हरकत नोंदविली आहे. त्यांचे असे कथन आहे की अर्जातील कथने खोटी आहेत. न्यायालयाने प्रतिवादींना कैफियत देण्यास मुभा दिली होती. परंतु त्यांनी कैफियत दिली नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

०३. वादीतर्फे वकील गैरहजर आहेत. प्रतिवादींतर्फे वकील श्री. धामापूरकर यांचा युक्तीवाद ऐकला. दि. ०९/०९/२०१४ रोजीचा रोजनामा पाहिला. नि. ४४ वरील आदेशाचे अवलोकन केले. त्यामध्ये प्रतिवादींनी कैफियत देण्याचे नाकारले असे कुठेही नमूद नाही. परंतु रोजनाम्यामध्ये तसा उल्लेख दिसून येतो. प्रत्येक पक्षकाराला त्याच्या खटल्यामध्ये त्याची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देणे गरजेचे आहे. अन्यथा पक्षकारांवर अन्याय होईल. सबब अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे. परंतु अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब पाहता प्रतिवादी क्र. २ ते १० यांनी वादीला रक्कम रु. १००/— खर्च देण्याच्या अटीवर नि. ६० चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

सही/—

मालवण,
दिनांक : ०७/१०/२०१५

( संतोष द. चव्हाण)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.